लोकमत

# दूरशिक्षण पद्धतीतील शैक्षणिक संधी

शिक्षण म्हणजे न संपणारी वाट ... या वाटेवर मानवी मूल्यांची व वैज्ञानिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शिक्षण संस्था, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ अविरत कार्यरत आहेत. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, तसेच त्यांना गती देण्याचे आश्वासक असे पाऊल

नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार अशा घटकांना विविध कारणांमुळे अपूर्ण राहिलेले शिक्षण वा

वरदान ठरत आहे.

देशातील १८ ते २३ वयोगटाच्या विद्यार्थ्यांपैकी २४.५% (२०१५-१६) विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतात. यामध्ये ११.०५ हे दूरशिक्षण अभ्यासक्रमाचे नावनोंदणी प्रमाण आहे; पण २०२० पर्यंत ३०% वाढविण्याचा केंद्र सरकारचा उद्देश आहे. त्यापैकी काही विद्यार्थी दूरशिक्षणाच्या माध्यमातून उच्च शिक्षणाच्या प्रवाहात सामील होतात. परंतु, ही संख्या देशाच्या व राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या दृष्टीने व इतर विकसित व विकसनशील देशांच्या तुलनेने अत्यंत अल्प आहे. ही संख्या वाढविण्याच्या दृष्टीने तसेच एक सामाजिक जबाबदारी म्हणून जे विद्यार्थी त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे, व्यवसाय, नोकरी किंवा अन्य अडचणींमुळे उच्च शिक्षणासाठी नियमित महाविद्यालयामध्ये प्रवेश घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांची उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असूनही शिक्षण खंडित होते अशा सर्व विद्यार्थ्यांना नोकरी, व्यवसाय, घरकाम, आदी सर्व गोष्टी सांभाळून उच्च शिक्षण घेता यावे म्हणून त्यांच्या सर्व अडचणींचा विचार करून विद्यापीठ अनुदान आयोग व दूरशिक्षण परिषद, नवी दिल्ली अधिक अधिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात जग एक वैश्विक खेड बनलेले आहे. ॲरिस्टॉटलने माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे असे म्हटले तरी आजचा समाज हा माहितीभिमुख समाज बनत आहे. माणूस शिक्षण क्षेत्राच्या आविष्कारामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा लाभार्थी होत असताना विविध कारणांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या कित्येक विद्यार्थ्यांना दूरशिक्षण पद्धतीमुळे पारंपरिक शिक्षणाव्यतिरिक्त अन्य आपल्या आवडीचे शिक्षण घेण्याचा मार्ग खुला झाला.

दूरशिक्षण पद्धतीने जे विद्यार्थी रीतसर महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकत नाही अशांना संधी उपलब्ध




- डॉ. नितीन रणदिवे

◆ समन्वयक सामाजिक शास्त्रे विद्याशाखा

◆ दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.


करून दिली आहे. समाजाचा एकूण स्तर उंचावयाचा असेल तर दूरशिक्षण सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. तसेच नोकरी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनाही आपल्या क्षेत्रामध्ये प्रगती करण्यासाठी, स्पर्धेत टिकून राहण्यासाठी नवनवीन बाबींचे प्रशिक्षण घेणे गरजेचे ठरू लागले. या सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी आणि प्रत्येकाला स्वत:च्या सोयीप्रमाणे शिक्षण घेता यावे या विचारातून दूरशिक्षण ही संकल्पना उदयास आली.

दूरशिक्षण ही एक लवचिक प्रक्रिया असून, ती वेळ, स्थळ व व्यक्ती यांच्या बंधनातून मुक्त आहे. त्यासाठी वयाची अट नसते. ग्रामीण आणि डोंगरी भागातील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना एकाच दर्जाचे शिक्षण मिळू शकते. यामध्ये लिंग, धर्म, जाती, वंध यावरून शैक्षणिक सुविधांमध्ये भेदाभेद असणार नाही. नियमित शिक्षणापेक्षा दूरशिक्षण पद्धतीत शिक्षण कमी खर्चाचे असते. विद्यार्थ्यांना छापील स्वयंअध्ययन साहित्य दिल्याने व संपर्क सत्रे घेतल्याने त्याच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारण्यास मदत होते, अशी महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये दूरशिक्षण पद्धतीची आहेत.

दूरशिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना त्यांची नोकरी किंवा इतर जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण पूर्ण करता येणार असून, त्यासाठी

अभ्यासाला पूरक ठरेल अशा स्वरुपात स्वयंअध्ययन साहित्याची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्याचे सखोल अध्ययन करण्यासाठी अभ्यासक्रम समजावून घेतला पाहिजे. तसेच काही संकल्पना किंवा शंका निरसन आपल्या अभ्यासकेंद्राने

दूरशिक्षण पद्धतीद्वारे पदवी, पदविका, प्रमाणपत्र प्राप्त करीत आहेत अशांना आता केंद्र सरकारच्या नोकरीसाठी ग्राह्य धरले जाणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाची (युजीसी) मान्यता असणाऱ्या विद्यापीठामधून दूरस्थ पद्धतीद्वारे दिल्या जाणाऱ्या सर्व दूरस्थ शिक्षणाच्या पदव्या, पदविका आणि प्रमाणपत्र केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये वैध ठरविले जात आहे.

केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने (उच्च शिक्षण विभाग ) यांनी दिनांक १० जून २०१५ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे दूर शिक्षण पद्धतीच्या सर्व अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता

विधिमंडळाच्या अधिनियमांद्वारे स्थापन झालेल्या महाविद्यालये, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९६५ अन्वये भाग तीनच्या अंतर्गत विद्यापीठ संस्था आणि संसद अधिनियमाद्वारे घोषित राष्ट्रीय महत्त्व असणाऱ्या संस्थाद्वारे दूरस्थ शिक्षण पद्धतीच्या माध्यमाने प्रदान केलेल्या पदवी, पदविका, प्रमाणपत्र

अनुदान आयोगाने मान्यता दिली आहे.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. २३ फेब्रुवारी २०१८ रोजी जारी केलेल्या पब्लिक नोटीसमध्ये पारंपरिक विद्यापीठ/संस्था, यांच्याप्रमाणेच दूरशिक्षण पद्धतीच्या पदवी, पदविका, व प्रमाणपत्र अभ्यासक्रम समकक्ष म्हणून मान्यता दिली आहे. तसेच प्रशिक्षण (प्रॅक्टिकल) असणाऱ्या इंजिनिअरिंग, मेडिसीन, डेन्टल, फार्मसी, नर्सिंग, आर्किटेक्चर व फिजिओथेरपी अशा अभ्यासक्रमांना दूरशिक्षण पद्धतीतून प्रवेशित होता येत नाही. नोकरीमध्ये पदोन्नतीसाठी व स्पर्धा परीक्षांसाठी


Web Site : www.griffonaviationacademy.co.in
एअर हॉस्टेस ▸ ग्राउंड स्टाफ ▸ हॉस्पिटॅलिटी क्षेत्र ▸ हॉटेल इंडस्ट्री

फोन: (0231) 2626882, 2621358
Web Site : www.firesafetycollegekolhapur.in
*T& C Apply

Affiliated to Maharashtra State Board | admissions@vcsc.in

# शिवाजी विद्यापीठात पर्यावरण दिन साजरा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पाच जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. यावर्षीची पर्यावरण दिनाची थीम 'हवा प्रदूषण कमी करा' अशी आहे. यानिमित्ताने विद्यापीठाच्या हरित पट्ट्यात वाढ होण्याकरिता वड व जांभूळ झाडांचे रोपण विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव, डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सरवदे, डॉ. कुच्चे, डॉ. आसावरी जाधव, पर्यावरण अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 JUN 2019

तरुण भारत

# विद्यापीठाची ऑनलाईन प्रवेश परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात एमबीए (रूरल मॅनेजमेंट), एमएसडब्ल्यू (रूरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एमआरएस या विषयांची कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ७ परीक्षा केंद्रावर ऑनलाईन प्रवेश परीक्षा झाली. परीक्षेसाठी २४८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी १८९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

# विविध अभ्यासक्रमांसाठी १८९ जणांची प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठी गुरुवारी १८९ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. त्यामध्ये एम. आर. एस. (मास्टर ऑफ रुरल स्टडीज), एम. बी. ए. (रुरल मॅनेजमेंट) आणि एम. एस. डब्ल्यू (रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. एकूण २४८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १८९ जणांनी परीक्षा दिली, तर ५९ जण गैरहजर राहिले. केआयटी कॉलेज, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या केंद्रांवर सकाळी साडेनऊ ते सायंकाळी पाच या वेळेत परीक्षा झाली. त्यात एम. आर. एस. अभ्यासक्रमासाठी १८, एम. बी. ए.च्या ८६ आणि एम. एस. डब्ल्यू अभ्यासक्रमासाठी ८५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.